DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**फौजदारी चौकशी अर्ज क्र.३०७/२०२०**
**निशाणी क्र.१९ खालील आदेश**

**पुष्पलता मल्लीकार्जुना मुद्दीसेट्टी आणि इतर १**
**विरुध्द**
**मल्लीकार्जुना रामासुबय्या मुद्दीसेट्टी**

सामनेवाला यांनी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.२ यास न्यायालयाच्या आवारात तारखेच्या दिवशी भेटण्याकरिता परवानगी मिळावी याकरिता दिलेला आहे. सदरचा अर्ज वाचला. सदर अर्जावरील अर्जदार क्र.१ यांनी दिलेले म्हणणे (निशाणी क्र.२०) वाचले. अर्जदारातर्फे वकील श्री. भारत दवंडे व सामनेवालातर्फे वकील श्री. आदित्य भाटे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार क्र.१ यांनी अशी हरकत घेतली आहे की, अर्जदार क्र.२ हा सामनेवाला यांना प्रचंड घाबरतो व सामनेवाला हा त्यास भरपुर मारहाण करतो. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती त्यांनी केली.

०२. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सामनेवाला यास या न्यायालयाने निशाणी क्र.५ वरील दिनांक ०४/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम पोटगी देण्याचा आदेश पारित केला आहे. तेव्हापासुन देय असणारी पोटगीची रक्कम सामनेवाला यांनी वेळोवेळी अर्जदार क्र.१ व २ यांना दिलेली दिसुन येत नाही. तसेच सामनेवाला हे प्रत्येक तारखेस हजर राहत नाहीत. यावरुन असे दिसुन येते की, सामनेवाला पती व पिता या नात्याने जबाबदारी पुर्ण करीत नाही व पिता या नात्याने पाल्याबाबतचा हक्क मात्र बजावु पाहत आहे. वर नमुद घटना व परिस्थिती यांचा विचार करता व सामनेवाला पती व पालक या नात्याने आवश्यक असणारी जबाबदारी पार पाडत नाही, तसेच न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे तो अर्जदार क्र.१ व २ यांना देय असणारी पोटगीची रक्कम दरमहा देत नाही, तसेच सामनेवाला हे स्वतः

प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SHAIKH BABASO S PATIL
Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL
Date: 2023.11.06 15:51:47 +0530

**(एस. एस. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०४/११/२०२३